जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 DEC 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी डॉ. मासाळ

**गडहिंग्लज :** येथील डॉ. घाळी कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. डॉ. नागनाथ मासाळ यांची शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड झाली. डॉ. मासाळ यांनी पदवी पर्यंतचे शिक्षण न्यू कॉलेजमध्ये तर पदव्युत्तर शिक्षण शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे घेतले. त्यांनी पदवी व पदव्युतर शिक्षण प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे चेअरमन अशोकराव शिंदे या- च्या घरी काम करत करत पूर्ण केले. गेल्या ३० वर्षांपासून डॉ. घाळी महाविद्यालय येथे इंग्रजी विभागाचे प्राध्यापक म्हणून काम करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ७ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी मिळविली आहे तर ७ विद्यार्थी पीएच.डी.चे मार्गदर्शन घेत आहेत. आजपर्यंत त्यांचे ८२ संशोधन निबंध राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध झालेले आहेत. तसेच त्यांचे पुस्तकही प्रसिद्ध झाले आहे. युजिसी अनुदानित १ संशोधन प्रकल्प पूर्ण केला आहे. त्यांनी राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय परिषदांमध्ये १०० हुन अधिक संशोधन निबंधांचे वाचन केले. नामांकित विद्यापीठाचे पीएच.डी. परीक्षक म्हणून काम पाहतात. त्यांच्या कार्याची दाखल घेऊन मरवडे भूषण पुरस्कार व महाराष्ट्र राज्य शाळा कृतीसमितीच्या वतीने कृतिशील प्राध्यापक पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आले. सन २०१६ ते २०२१ पर्यंत त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे स्थायी समिती सदस्य म्हणून कार्य पाहिले आहे. या निवडीसाठी त्यांना विद्यापीठ विकास आघाडीचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील, माजी प्राचार्य सी. आर. गोडसे, प्राचार्य व्ही. एम. पाटील, डॉ. रघुनाथ ढमकले यांचे सहकार्य लाभले.



**डॉ. नागनाथ मासाळ**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 DEC 2024
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्यपदी मासाळ



गडहिंग्लज : येथील डॉ. घाळी महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. नागनाथ मासाळ यांची शिवाजी विद्यापीठाच्या सिनेट सदस्यपदी निवड झाली. गेल्या तीस वर्षांपासून डॉ. घाळी महाविद्यालयात ते प्राध्यापक म्हणून काम करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ७ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी मिळवली आहे, तर आजपर्यंत त्यांचे ८२ संशोधन निबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध झाले आहेत. एक पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. यूजीसी अनुदानित एक संशोधन प्रकल्प पूर्ण केला आहे. सन २०१६ ते २०२१ पर्यंत त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे स्थायी समिती सदस्य म्हणून कार्य केले आहे. निवडीसाठी त्यांना डॉ. संजय पाटील, डी. आर. मोरे, क्रांतिकुमार पाटील, सी. आर. गोडसे, प्राचार्य व्ही. एम. पाटील, रघुनाथ ढमकले यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 DEC 2024
सकाळ



कोल्हापूर : जैन युवती मंडळाच्यावतीने आयोजित आर्थिक सक्षमीकरण चर्चासत्रात बोलताना विजय ककडे. सोबत मान्यवर.

# स्त्रीने आर्थिक रूपाने सक्षम होणे आवश्यक : ककडे

## 'जितो'तर्फे आर्थिक साक्षरता चर्चासत्र

कोल्हापूर, ता. २५ : "समाधानपूर्वक जगण्यासाठी पैसा आपल्या हातात असावा; म्हणूनच प्रत्येक स्त्रीने आर्थिक रूपाने सक्षम होणे आवश्यक आहे. तसेच शेअर मार्केटमध्ये महिलांचे प्रमाण वाढले आहे आणि कॅपिटल मार्केटमध्ये चांगल्या करिअरच्या संधीदेखील उपलब्ध आहेत," असे प्रतिपादन अर्थतज्ज्ञ विजय ककडे यांनी केले.

ते जैन युवती मंडळ शाहूपुरी भारतीय जैन संघटना पुणे, जितो कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्रियांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आयोजित चर्चासत्रात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. एसपी वेल्थचे अनिल पाटील म्हणाले, 'महागाई दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु त्यातून कमी पैशांमध्येदेखील बचत करून आपली आर्थिक स्थिती कशी सुधारावी, याबाबत त्यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी कोल्हापूर चाप्टर जितोचे चेअरमन रवी संघवी, बीजीएसचे अभिनंदन खोत, जैन युती मंडळाच्या अध्यक्षा डॉ. सुनीती गोपलकर, भारती भूमकर, माधुरी आडके, सुनीता निल्ले, पल्लवी बागी, ज्योती पाटील, सावित्री वणकुद्रे, शोभा मिठारी, अश्विनी लाटकर, प्रिया चिवटे, भारती उपाध्ये, सुनीता पाटील, रविकांत उपाध्ये, प्रशांत उपाध्ये, राजाभाऊ शहा तसेच विविध क्षेत्रांतील महिला, युवक-युवती उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 DEC 2024
लोकमत

# नेटबॉल स्पर्धेत कमला कॉलेज विजयी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात झालेल्या विभागीय नेटबॉल स्पर्धेत कमला कॉलेजच्या वरिष्ठ विभागाने अंतिम सामन्यात जयसिंगपूरच्या कन्या महाविद्यालय संघावर ५-० ने मात करून विजेतेपदक पटकाविले. हा संघ शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय नेटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरला. संघात कर्णधार सना मुल्ला, श्रुती कलकुटकी, मानसी वासुदेव, स्नेहल बागणे, सृष्टी देसाई, प्रज्वली चौगुले, दिया माने, दीक्षा कांबळे, सादिया शेख यांचा समावेश होता. खेळाडूंना ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील, प्राजक्त पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. नीता धुमाळ, शारीरिक शिक्षण संचालिका ज्योती लेंगरे, प्रशिक्षक पूजा ठाकूर यांचे मार्गदर्शन लाभले.